# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

## अपील क्रमांक : १३९९/२०२२

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. संजय भिमरावजी भगत, रा. टाकळी (निधा) पो. सिरसगांव ता. हिंगणघाट जि. वर्धा. | सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट ता. हिंगणघाट जिल्हा वर्धा. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट, ता. हिंगणघाट जिल्हा वर्धा. |

**सुनावणी दिनांक :- १३.११.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २३.०५.२०२२

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : २५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती मिळाली नसल्यामुळे.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कलम २०(२) अन्वये खाते निहाय चौकशी करुन मागितलेली माहिती उपलब्ध करुन दयावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : दि. १४.०१.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. १७.०१.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : --

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : मा. जन माहिती अधिकारी साहेब प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सन २०१६-१७ रोजी शासन परिपत्रकानुसार प्रपत्र ब मध्ये ग्राम सभेद्वारे अ, ब, क, ड क्रम यादी तयार केली व आपणाकडे सादर करुन आपणाद्वारे अ,ब,क,ड नुसार किती लाभार्थ्यांचे प्रस्ताव वरिष्ठांना पाठवून वरिष्ठांनी मंजूरी दिली व आपणाद्वारे कशा पध्दतीने योजना राबविण्यात आली याबाबतची संपूर्ण वरिष्ठांच्या पत्रांसह माहिती पुरविण्यात यावी, याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम सादर.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक १७.०१.२०२२ रोजी अपीलार्थी यांच्या अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता मानीव माहिती अधिकारी श्री. अशोक डेकाटे कनिष्ठ आरेखक, पंचायत समिती हिंगणघाट यांना कलम ६ (१)(ख) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कळविण्यात आले. त्यानुसार मानीव जन माहिती अधिकारी

यांनी दिनांक २७.०१.२०२२ ला जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहितीचे एकूण २७ पाने अर्जदार श्री. भगत यांना दिनांक ०३.०२.२०२२ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : दि. १६.०२.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. २१.०२.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अपूर्ण मिळाली असल्यामुळे

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक २२.०३.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान अपीलार्थी श्री. संजय भगत यांना यापूर्वीच दिनांक ०३.०२.२०२२ चे पत्रान्वये २७ पाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. सदरची माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी प्रपत्र ब अन्वये दाखल केलेल्या अपील मध्ये मान्य केलेले आहे. जरी त्यांनी प्रपत्र मध्ये प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व असमाधानकारक असल्याचे नमूद करुन दिनांक १६.०२.२०२२ ला प्रथम अपिल दाखल केली आहे. परंतु प्रत्यक्षात कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपीलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे, असा आदेश पारीत करण्यात आला.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा** — अपीलार्थी हजर आहेत, प्रतिवादी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. परंतू त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त झालेला आहे.

**६. निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे, असे आढळून येते.

२) अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांचा प्रथम अपील आदेश योग्य आहे.

३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट यांना निवडणूक प्रशिक्षणामुळे उपस्थित राहाता आले नाही व त्याबाबत त्यांनी पत्र दिले आहे.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.११.२०२४**

जावक क्रमांक 236 दिनांक 13 JAN 2025